**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६ ००४.**

**महत्वाचे परीक्षा प्राधान्य**

क्र.कोविमं/उ.मा.गोप/स्विकृती/मार्च २०२२/ 2322
कोल्हापूर ४१६००४
दिनांक : ०६/०१/२०२२

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
मान्यताप्राप्त सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय** - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता १२ वी मार्च/एप्रिल २०२२ परीक्षक/नियामक स्विकृती पत्राबाबत.
**संदर्भ** - या कार्यालयाचे पत्र क्र.कोविमं/उमागोप/स्विकृती/ मार्च २०२२/ २३०६ दिनांक ०५/०१/२०२२

उच्च माध्यमिक इयत्ता १२ वी प्रमाणपत्र परीक्षा मार्च/एप्रिल २०२२ परीक्षेच्या लेखी परीक्षेकरीता उत्तरपत्रिका तपासणीसाठी परीक्षक/नियामक यांच्या नियुक्ती संदर्भात स्विकृती पत्रे तथा शिक्षक माहिती या कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भ पत्रासोबत आपणास पाठविण्यात आलेली आहे. सदरहू स्विकृती पत्रे आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या शिक्षकांची परिपूर्ण माहितीची यादी संबधीत शिक्षकांची स्वाक्षरी घेवून आपल्या जिल्हा वितरण केंद्रावर हस्तपोहच जमा करण्यासंदर्भात सुचित करण्यात आलेले आहे.

त्याप्रमाणे शिक्षक माहिती यादी कोणत्याही परिस्थितीत **शुक्रवार दिनांक १४ जानेवारी,२०२२** रोजी जिल्हा वितरण केंद्रावर जमा करावयाची आहेत. शिक्षकांच्या स्विकृती पत्राशिवाय कागदपत्र स्वीकारली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.स्विकृतीपत्रे विहीत मुदतीत प्राप्त न झालेस त्याबाबत सर्वस्वी जबाबदारी कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांची राहील.

(एस.डी. सोनवणे)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

## जिल्हा वितरण केंद्रासाठी सूचना.

वरील सुचनांप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्राप्त होणारी परीक्षक/नियामक नियुक्ती पत्रे व इतर माहिती, **दिनांक १७/०१/२०२२** रोजी कनिष्ठ महाविद्यालयनिहाय यादी करून स्वतंत्रपणे मंडळ कार्यालयात इ.१२ वी गोपनीय विभागाकडे जमा करावयाची आहेत.